Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

प्रवक्ता अकॅडमीत 'आनंद मेळावा' आणि गणेशोत्सव उत्साहात

(पान २ वर)



। रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६१ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

भारताविरुद्धच्या मालिकेसाठी वेस्ट इंडिजचा संघ जाहीर

मुंबई : भारताविरुद्धच्या आगामी वनडे आणि टी-20 मालिकेसाठी वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने संघांची घोषणा केली आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात 27 सप्टेंबर ते 18 ऑक्टोबरदरम्यान एकूण आठ शहरांमध्ये तीन वनडे आणि पाच टी-20 सामने खेळवले जाणार आहेत. दोन्ही फॉरमॅटमध्ये वेस्ट इंडिजचे नेतृत्व शाई होप करणार आहे. श्रीलंका आणि न्यूझीलंडविरुद्धच्या अलीकडील घरच्या मालिकेत खेळलेल्या बहुतांश खेळाडूंवर वेस्ट इंडिजने पुन्हा विश्वास दाखवला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतील अखेरचे दोन वनडे हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे मुकलेल्या जॉन कॅम्पबेलचे संघात पुनरागमन झाले आहे. मात्र, ऑगस्टमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर सध्या पुनर्वसन प्रक्रियेत असलेला अकिम ऑगस्ट भारताविरुद्धच्या मालिकेत खेळणार नाही. त्याच्या जागी ज्वेल अँड्रयूला संघात स्थान देण्यात आले

अर्थसंकल्पातील कपात, पेपर लीक आणि ६ लोकांच्या हाती असलेल्या सत्तेवर जोरदार हल्लाबोल

सध्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना घाबरते!

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली । "सध्याची 'सिस्टीम' हा प्रश्न विचारणाऱ्या जिज्ञासू विद्यार्थ्याऐवजी आंधळेपणाने विश्वास ठेवणाऱ्या 'अंधभक्तांना' जवळ करते, कारण ही सिस्टीम विद्यार्थ्यांना घाबरते," अशा घणाघाती शब्दांत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला.मध्य प्रदेशातील इंदूर येथे आयोजित 'छात्रों की गूंज' या विद्यार्थी संवाद कार्यक्रमाच्या पाचव्या आवृत्तीत राहुल गांधी बोलत होते.

इंदूरमधील 'छात्रों की गूंज' कार्यक्रमातून राहुल गांधींची टीका!

उपस्थित तरुण विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राहुल गांधी म्हणाले, "या देशातील सिस्टीमवर काही ठराविक लोकांचा कब्जा झाला आहे. शीर्षस्थानी सहा लोक बसले असून ते सर्व यंत्रणा नियंत्रित करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी ही सिस्टीम चालवत आहेत, तर विद्यार्थ्यांना दडपणे, त्यांच्यावर लाठीमार करणे आणि पेलेट गन वापरणे हे काम गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे आहे; ते या सिस्टीमचे 'एनफोर्सर', अंमलबजावणी करणारे आहेत."राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यावर आरोप करताना राहुल गांधी म्हणाले की, "डोवाल यांच्याकडे टेलिफोन, व्हॉट्सॲप आणि फेसबुकसारख्या



सर्व संवादमाध्यमांचे नियंत्रण आहे. ते फोन टॅपिंग करून मिळालेली माहिती मोदी आणि अमित शाह यांना पुरवतात. तर दुसरीकडे, आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांना शाळा, महाविद्यालये आणि संस्था चालवण्यासाठी हजारो कोटी रुपये दिले जात आहेत."शिक्षण क्षेत्रातील निधीचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी क्रिकेट प्रशासनाचा दाखला दिला. "भारतात सचिन तेंडुलकर, कपिल देव यांच्यासारखे अनेक महान क्रिकेटपटू होऊन गेले. परंतु, या सिस्टीमने देशातील संपूर्ण क्रिकेट प्रशासन गृहमंत्री अमित शाह यांच्या मुलाच्या (जय शाह) हाती सोपवले आहे," असा टोला त्यांनी लगावला."अंधभक्त म्हणतात की भारताला स्वातंत्र्य मिळालेच नाही, देशाला विकासाची गरज नाही किंवा मोदी हे विष्णूचा अवतार आहेत. अंधभक्त कधीही हे विचारणार नाहीत की आपल्या शाळा-कॉलेजेसची अवस्था का बिघडली आहे? पायाभूत सुविधा का ढासळल्या आहेत? किंवा भरती परीक्षांचे पेपर का लीक होत आहेत? हे प्रश्न फक्त एक जागरूक विद्यार्थीच विचारू शकतो," असे राहुल गांधी म्हणाले. अर्थसंकल्पात कपात: २०१४ मध्ये काँग्रेस सरकारच्या काळातीलती आता घटवून २.६% वर आणली आहे. अब्जाधीशांचा फायदा: शिक्षणासाठी जाणारा सुमारे ७.७ लाख कोटी रुपयांचा निधी शिक्षण व्यवस्थेत न जाता अदानी-अंबानींसारख्या उद्योगपतींच्या खिशात गेला, असा थेट आरोप त्यांनी केला. शिष्यवृत्तीत कपात: गेल्या १० वर्षांत १.५ कोटी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती हिरावून घेण्यात आली आहे. शाळा बंद: देशभरात सुमारे १ लाख सरकारी शाळा बंद पडल्या असून, त्यातील ५५% शाळा एकट्या मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील आहेत.

पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन

५ मजली इमारत कोसळून प्राण गमावलेल्या १८ वर्षीय अर्पित जाज या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची राहुल गांधींनी व्यासपीठावर भेट घेतली. अर्पितची मोठी बहीण प्रियांशी जाज हिने अत्यंत भावुक होत प्रश्न उपस्थित केला, "सिस्टीमच्या निष्काळजीपणामुळे निष्पाप विद्यार्थ्यांचे बळी जात आहेत. मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना घरापासून दूर राहावे लागते. या दुर्घटनेत माझ्या भावाचा काय दोष होता?" राहुल गांधींनी या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

काळाचौकीचा महागणपतीच्या मंडपासमोर भीषण घटना, शॉक लागून पाच जण जखमी

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: यंदाच्या मुंबईतील गणेशोत्सवात सुरु असलेली विघ्नांची आणि संकटांची मालिका काही केल्या थांबताना दिसत नाही. मुंबईतील यंदाच्या गणेश आगमन सोहळ्यात काही गणेशमूर्ती (Ganesh Idol) कोसळल्याच्या घटना समोर आल्या होत्या. त्यानंतर आता दक्षिण मुंबईतील काळाचौकीचा महागणपत मंडळाच्या परिसरात वीजेचा झटका लागून एका मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर पाच जण जखमी आहेत. प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी रात्री उशीरा काळाचौकीचा महागणपतीच्या मंडप परिसरात ही घटना घडली. काल मध्यरात्री भाविक मोठ्याप्रमाणावर काळाचौकीचा महागणपतीच्या दर्शनाला आले होते. याठिकाणी वीजेचा झटका लागून पाच जण जखमी झाले. यामध्ये लहान मुलांचा आणि तरुणांचा समावेश आहे. या घटनेनंतर अग्निशमन दलाला तातडीने पाचारण करण्यात आले. दुर्घटनेत जखमी झालेल्या पाच जणांना तातडीने नजीकच्या मसीना रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तर प्रकृती गंभीर असलेल्या एका मुलीला उपचारासाठी परळच्या ग्लोबल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वीजेचा झटका लागून जखमी झालेल्यामध्ये दोन मुले आणि तीन मुलींचा समावेश आहे. हे सर्वजण 8 ते 20 या वयोगटातील आहेत. जखमींपैकी आठ वर्षांच्या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर मसीना रुग्णालयात नेण्यात आलेल्या तिघांवर अतिदक्षता कक्षात उपचार सुरु असल्याचे समजते. हे सर्वजण याच परिसरात वास्तव्याला होते. या सर्व मुलांना वीजेचा झटका कसा लागला, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. मात्र, या दुर्घटनेमुळे लालबाग-परळमध्ये



दु:खाचे सावट पसरले आहे. यंदा मुंबईत तीन ठिकाणी आगमनावेळी गणपतीची मूर्ती कोसळल्याची दुर्घटना घडली होती. 22 ऑगस्टला भुलेश्वरचा राजाची मूर्ती कोसळली होती. त्याखाली दबून दोन संकेत नेवशे (वय 33 वर्षे) आणि ब्रिजेश हेमंत जोशी (वय 30 वर्षे) या दोन कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. यानंतर कुर्ला परिसरात धारावीतील प्रेमनगरचा महाराजा गणपती मंडळाची मूर्ती कोसळली होती. ही मूर्ती तुटल्यामुळे तिचे लगेच कुर्ला येथील शीतल तलावात विसर्जन करण्यात आले होते. यंदाच्या मुंबईतील गणेशोत्सवात सुरु असलेली विघ्नांची आणि संकटांची मालिका काही केल्या थांबताना दिसत नाही. मुंबईतील यंदाच्या गणेश आगमन सोहळ्यात काही गणेशमूर्ती (Ganesh Idol) कोसळल्याच्या घटना समोर आल्या होत्या. त्यानंतर आता दक्षिण मुंबईतील काळाचौकीचा महागणपत मंडळाच्या परिसरात वीजेचा झटका लागून एका मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर पाच जण जखमी आहेत. प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी रात्री उशीरा काळाचौकीचा महागणपतीच्या मंडप परिसरात ही घटना घडली. काल मध्यरात्री भाविक मोठ्याप्रमाणावर काळाचौकीचा महागणपतीच्या दर्शनाला आले होते. याठिकाणी वीजेचा झटका लागून पाच जण जखमी झाले. यामध्ये लहान मुलांचा आणि तरुणांचा समावेश आहे. या घटनेनंतर अग्निशमन दलाला तातडीने पाचारण करण्यात आले. दुर्घटनेत जखमी झालेल्या पाच जणांना तातडीने नजीकच्या मसीना रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तर प्रकृती गंभीर असलेल्या एका मुलीला उपचारासाठी परळच्या ग्लोबल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वीजेचा झटका लागून जखमी झालेल्यामध्ये दोन मुले आणि तीन मुलींचा समावेश आहे. हे सर्वजण 8 ते 20 या वयोगटातील आहेत. जखमींपैकी आठ वर्षांच्या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर मसीना रुग्णालयात नेण्यात आलेल्या तिघांवर अतिदक्षता कक्षात उपचार सुरु असल्याचे समजते. हे सर्वजण याच परिसरात वास्तव्याला होते. या सर्व मुलांना वीजेचा झटका कसा लागला, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे.

1 ऑक्टोबरपासून सिलेंडरचा नियम बदलणार

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली |प्रतिनिधी: देशातील कोट्यवधी घरगुती एलपीजी ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. जर तुम्ही घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करत असाल तर तुम्हाला सरकारकडून मिळणारी सब्सिडी सुरु ठेवण्यासाठी आधार प्रमाणीकरणाद्वारे ई केवायसी करावी लागणार आहे.

1 ऑक्टोबर 2026 पासून सब्सिडीच्या दरात एलपीजी गॅस सिलेंडर घेण्यासाठी ग्राहकाची आधार पडताळणी पूर्ण झालेली असणं आवश्यक आहे.एलपीजी गॅस कनेक्शन ज्या ग्राहकाच्या नावावर आहे, तोच व्यक्ती त्या कनेक्शनचा वापर करतोय का आणि सब्सिडीचा फायदा योग्य व्यक्तीला मिळतोय हे निश्चित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.आतापर्यंत ज्या एलपीजी ग्राहकांनी आधारद्वारे पडताळणी म्हणजे ई केवायसी केलेली नाही त्यांना सरकारनं वेळ वाढवून दिला होता. सरकारनं यापूर्वी 30 जून 2026 पर्यंत ई केवायसी करण्यास सांगितलं होतं.

मात्र, नंतर सरकारनं मुदतवाढ दिली. जर तुम्हाला एलपीजी सब्सिडीचा फायदा घ्यायचा असेल आणि अजूनही ई केवायसी किंवा आधार प्रमाणीकरण पूर्ण केलं नसेल तर ते पूर्ण करावं लागेल. ज्या ग्राहकांनी ई केवायसी केली असेल त्यांना पुन्हा ती प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज नाही.

बायोमेट्रिक आधार पडताळणी म्हणजेच आधार द्वारे करण्यात आलेली पडताळणी होय. यामध्ये आधार क्रमांकासह तुमची ओळख पटवली जाते. यामध्ये बायोमेट्रिक पद्धतीनं आधार पडताळणी करावी लागते.

म्हणजेच अंगठ्याच्या किंवा बोटांचे ठशांद्वारे प्रमाणीकरण करावं लागतं. सरकारच्या आकडेवारीनुसार 19 सप्टेंबर 2026 पर्यंत 27 कोटी 43 लाख सक्रीय घरगुती एलपीजी ग्राहकांची आधार बेस्ड बायोमेट्रिक पडताळणी पूर्ण झाली आहे. ही संख्या एकूण ग्राहकांच्या 89.9 टक्के आहे. म्हणजेच 90 टक्के लोकांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अजून थोडे ग्राहक आहेत त्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

ग्रामसेवक मृत्यूप्रकरणानंतर पोलीस पाटलाला मानसिक त्रासाचा आरोप

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी: पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे ग्रामसेवकाच्या मृत्यूप्रकरणानंतर स्थानिक पोलीस पाटलावर दबाव आणला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलीस पाटलाला मानसिक त्रास देणे, अरेरावी करणे तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्याचा दावा महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाने केला आहे.

या पार्श्वभूमीवर संघाच्या वतीने पारोळा पोलिस प्रशासनाला निवेदन देत संबंधित पोलीस पाटलाला सुरक्षा देण्याची आणि दबाव आणणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. शिवरे दिगर येथे १७ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेदरम्यान गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर ग्रामसेवक पी. एन. पाटील यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला.

या घटनेनंतर दिवंगत ग्रामसेवकाच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारोळा पोलिस ठाण्यात संशयितांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपासादरम्यान काही संशयितांना अटक केली आहे. पोलीस पाटलाला घेराव घातल्याचा आरोप या प्रकरणातील अटकेत असलेल्या संशयितांची नावे पोलीस पाटील



तुकाराम पाटील यांनीच दिल्याचा आरोप करत संशयितांच्या नातेवाईकांसह सुमारे २५० ते ३०० जणांच्या जमावाने १५ सप्टेंबर २०२६ रोजी पारोळा पोलीस ठाण्याच्या आवारात तुकाराम पाटील यांना घेराव घातल्याचा दावा करण्यात आला आहे. यावेळी जमावातील काही व्यक्तींनी अरेरावीची भाषा वापरून मानसिक त्रास दिला तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे पोलीस पाटलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, त्यांच्या संरक्षणासाठी संघटनेने पोलिस प्रशासनाकडे धाव घेतली. पोलीस पाटील संघ आक्रमक या घटनेच्या निषेधार्थ १६ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने पारोळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना निवेदन देण्यात आले. पोलीस पाटलांना आवश्यक सुरक्षा देण्यात यावी तसेच त्यांच्यावर दबाव आणणाऱ्या संबंधित व्यक्तींविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. 'अन्याय होऊ देणार नाही' निवेदन स्वीकारल्यानंतर पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस पाटलांच्या पाठीशी पोलिस प्रशासन खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन दिले. पोलीस पाटलांवर कोणताही अन्याय होऊ दिला जाणार नाही.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचा बळीराजाला भरीव मदतीचा शब्द

राष्ट्रवादीचे नेते तथा खासदार प्रफुल पटेल यांचंही दुष्काळी परिस्थितीवर महत्वपूर्ण भाष्य

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: राज्यात पावसाअभावी दुष्काळाचे भीषण वास्तव आता दिसू लागले आहे. या दुष्काळाचा सर्वाधिक फटका बळीराज्याला बसला असून मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतोय. अशातच कृषिमंत्री तथा वाशिमचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे (DATTATRAY BHARNE) दुष्काळ दौऱ्यावर असतांना अनेक ठिकाणी शेतात जाऊन पावसाअभावी झालेल्या नुकसानीची पाहणी केली. मात्र, कारंजा तालुक्यातील खेरडा इथ पोहचण्यास त्यांना उशीर झाला तरीही त्यांनी नियोजित दौरा अर्ध्यावर न सोडता रात्री उशिरा शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आणि शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. पावसाअभावी वाशिम जिल्ह्यात पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून खरीप हंगाम हातचा गेलाय. सहाही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना भरीव मदत जाहीर करू. या संकटात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभं आहे, असा विश्वास भरने यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

त्यामुळे आता शासन बळीराज्याला या अस्मानी संकटातून नेमकं कधी आणि कसं बाहेर काढतं याकडे शेतकऱ्यांचा नजरा लागल्या आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार प्रफुल पटेल यांनी महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रापुढील आव्हानं आणि राज्य शासनाच्या भूमिकेवर महत्त्वपूर्ण भाष्य केलं आहे. यंदा एल निनोच्या प्रभावामुळं राज्यातील 20 ते 20 जिल्ह्यांमध्ये



निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर शासनाकडून तातडीनं उपाययोजना केल्या जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. एल निनोच्या पावसामुळं अनेक जिल्ह्यांत झालेली अल्पवृष्टी लक्षात घेता, सरकारनं तातडीनं दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आणि गावकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी नेहमीच शेतकरी बांधवांना प्राथमिकता दिली असून, हे शासन खऱ्या अर्थाने 'बळीराजाच्या पाठीशी' उभं राहणारं सरकार असल्याचे प्रफुल पटेल यांनी स्पष्ट केले.दरम्यान, अडचणीच्या काळात शेतकऱ्यांसोबत उभे राहत राज्य सरकारनं दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करून एक ऐतिहासिक व मोठं पाऊल उचललं असल्याचं त्यांनी नमूद केलं. निसर्गाच्या लहरीपणाचा आणि किडींच्या प्रादुर्भावाचा सामना करणाऱ्या धान उत्पादक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी शासनाकडून विशेष पॅकेज म्हणून बोनस देण्याचा कार्यक्रम राज्य सरकार राबवित असल्याचा आशावाद प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला.राज्यात पावसाअभावी दुष्काळाचे भीषण वास्तव आता दिसू लागले आहे.

या दुष्काळाचा सर्वाधिक फटका बळीराज्याला बसला असून मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतोय. अशातच कृषिमंत्री तथा वाशिमचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे (DATTATRAY BHARNE) दुष्काळ दौऱ्यावर असतांना अनेक ठिकाणी शेतात जाऊन पावसाअभावी झालेल्या नुकसानीची पाहणी केली. मात्र, कारंजा तालुक्यातील खेरडा इथ पोहचण्यास त्यांना उशीर झाला तरीही त्यांनी नियोजित दौरा अर्ध्यावर न सोडता रात्री उशिरा शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आणि शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. पावसाअभावी वाशिम जिल्ह्यात पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून खरीप हंगाम हातचा गेलाय. सहाही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना भरीव मदत जाहीर करू. या संकटात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभं आहे, असा विश्वास भरने यांनी शेतकऱ्यांना दिला आहे. त्यामुळे आता शासन बळीराज्याला या अस्मानी संकटातून नेमकं कधी आणि कसं बाहेर काढतं याकडे शेतकऱ्यांचा नजरा लागल्या आहे.

कोल्हे हिल्समध्ये पर्वतकर कुटुंबीयांच्या घरी महालक्ष्मीचे उत्साहात आगमन!

जन सम्राट टाईम्स

जळगाव| प्रतिनिधी: जळगाव शहरातील कोल्हे हिल्स परिसरात निलेशकुमार सुभाषचंद्र पर्वतकर यांच्या निवासस्थानी यंदाही मोठ्या श्रद्धा, उत्साह आणि भक्तिमय वातावरणात महालक्ष्मीचे आगमन झाले. या धार्मिक व मांगलिक प्रसंगी पर्वतकर कुटुंबातील नातेवाईक, आप्तेष्ट आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून महालक्ष्मीचे दर्शन घेतले. महालक्ष्मीच्या आगमनानंतर कुटुंबीयांच्या वतीने महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला परिसरातील तसेच दूरवरून आलेल्या नातेवाईकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थितांनी भक्तिभावाने महालक्ष्मीचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. या धार्मिक सोहळ्यामुळे पर्वतकर कुटुंबीयांच्या निवासस्थानी दिवसभर भक्तिमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित नातेवाईक व आप्तेष्टांचे पर्वतकर कुटुंबीयांच्या



वतीने स्वागत करण्यात आले. महालक्ष्मी आगमनाच्या निमित्ताने कुटुंबीय, नातेवाईक आणि आप्तेष्ट एकत्र आल्याने परस्पर स्नेह, श्रद्धा आणि कौटुंबिक एकोप्याचे दर्शन या सोहळ्यात घडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्वतकर परिवारासह नातेवाईक आणि आप्तेष्टांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यात्रेतील मंगळसूत्र चोर टोळीचा पर्दाफाश; मेहुणबारे पोलिसांची थरारक कारवाई तीन पुरुष, दोन महिला अटकेत!

विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात – ८ लाख १६ हजार ८८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : यात्रेतील गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व दागिने लंपास करणाऱ्या टोळीचा मेहुणबारे पोलिसांनी अवघ्या काही तासांत पर्दाफाश केला. लांबे येथील शेंद्रे बाबा यांच्या यात्रेत मंगळसूत्र चोरीची घटना घडल्यानंतर पोलिसांनी संशयित पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कारचा माग काढत थरारक पाठलाग केला. रहिपुरी गावाबाहेर कार अर्धवट सिमेंटच्या पोलमध्ये अडकल्यानंतर तीन संशयितांना वाहनासह ताब्यात घेण्यात आले.पुढील तपासात दोन महिला साथीदारांसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकापर्यंत पोलिस पोहोचले. या कारवाईत तीन पुरुष आणि दोन महिला आरोपींना अटक करण्यात आली असून, एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींकडून २४.२६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, मंगळसूत्रातील सोन्याच्या १७ वाट्या व २४ मणी, तीन मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची मारुती डिझायर कार असा एकूण ८ लाख १६ हजार ८८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात्रेत मंगळसूत्र लंपास लांबे गावचे ग्रामदैवत असलेल्या शेंद्रे बाबा यांच्या यात्रेत गुरुवारी, दि. १८ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे ४ वाजता एक महिला यात्रेत फिरत असताना तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने लंपास केले. याप्रकरणी महिलेने शुक्रवारी, दि. १९ सप्टेंबर रोजी मेहुणबारे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून गुन्हा रजिस्टर क्रमांक २६३/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

यात्रेतील गर्दीचा फायदा घेऊन चोरी झाल्याने पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेतले. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी मेहुणबारे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक सह्याद्री बिर्ले यांना तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने गोपनीय माहिती संकलन सुरू केले. 'एमएच-१६'च्या धाग्याने पाठलाग तपासादरम्यान संशयित आरोपी



पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कारमधून पसार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

वाहनाचा क्रमांक एमएच-१६ असल्याचे समोर आले; मात्र पुढील क्रमांक उपलब्ध नव्हता. या माहितीच्या आधारे पोलिसांनी जामधा फाटा येथे नाकाबंदी केली. दरम्यान, चाळीसगावकडून जामधा फाट्याकडे येणारी संशयित कार पोलिसांच्या नजरेस पडली. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला; मात्र चालकाने कार न थांबवता भरधाव वेगाने जामधाच्या दिशेने पळवून नेली. त्यानंतर पोलिसांनी शासकीय वाहनासह खासगी मोटारसायकलींच्या मदतीने कारचा पाठलाग सुरू केला. पोलिसांचा पाठलाग सुरू असल्याचे लक्षात येताच संशयितांनी कारचा वेग वाढविला. मात्र रहिपुरी गावाबाहेर बोरखेड्याकडे जाणाऱ्या वळण रस्त्यावर कार रस्त्याच्या कडेला असलेल्या अर्धवट सिमेंटच्या पोलमध्ये अडकली. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने कारमधील तीन पुरुषांना ताब्यात घेतले. चौकशीत महिला साथीदारांचा धागा ताब्यात घेतलेल्या संशयितांची पोलीस ठाण्यात चौकशी करण्यात आली. तपासादरम्यान महिला साथीदारांच्या मदतीने यात्रेत मंगळसूत्र चोरी केल्याची माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर रहिपुरी परिसरात शोध घेऊन मोनिका तुकाराम चव्हाण (वय २३, रा. सुंदरनगर, वर्धा) आणि सुभाना राकेश भोसले (वय १९, रा. आर्वी, अमरावती) यांना ताब्यात घेण्यात आले. एका विधीसंघर्षग्रस्त बालकासही ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात सतिष तुकाराम चव्हाण, ओम तुकाराम चव्हाण आणि कुणाल सरनेरसिंग चव्हाण या तिघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीचे दागिने, मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरलेली डिझायर कार जप्त केली. ८.१६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत जप्त मुद्देमालामध्ये २४.२६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, मंगळसूत्रातील १७ सोन्याच्या वाट्या आणि २४ सोन्याचे मणी यांचा समावेश आहे. या सोन्याची किंमत ३ लाख ८० हजार ८८२ रुपये, तीन मोबाईल फोनची किंमत ३६ हजार रुपये, तर पांढऱ्या रंगाच्या मारुती डिझायर कारची किंमत ४ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. अशा प्रकारे एकूण ८ लाख १६ हजार ८८२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. चाळीसगाव, नांदगाव, नाशिकमध्येही हात साफ? चौकशीदरम्यान आरोपींनी यापूर्वी चाळीसगाव, नांदगाव बसस्थानक तसेच नाशिक शहरातील सीबीएस बसस्थानक परिसरात महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र व सोन्याचे मणी चोरी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे या टोळीने आणखी कुठे अशाच प्रकारे चोरी केली आहे का, याचा तपास सुरू आहे. यात्रा, बाजारपेठा आणि बसस्थानकांवरील गर्दीचा फायदा घेत दागिने चोरणाऱ्या या टोळीचा पर्दाफाश झाल्याने तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

महापौर दीपमाला काळे यांच्या घरच्या गणरायाचे विधिवत विसर्जन



जन सम्राट टाईम्स

जळगाव|प्रतिनिधी 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा' या आवाहनाला केवळ शब्दांपुरते मर्यादित न ठेवता कृतीतून त्याचा आदर्श घालून देत जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी आपल्या घरच्या श्री गणेशाचे पाचव्या दिवशी पर्यावरणपूरक पद्धतीने विधिवत विसर्जन केले. त्यांच्या या उपक्रमातून गणेशोत्सवात पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. महाआरतीनंतर महापौरांच्या निवासस्थानी गच्चीवर मोठ्या टबमध्ये पाणी घेऊन श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. महापौरांचे चिरंजीव नीरज मनोज काळे यांच्या हस्ते हा विधी पार पडला. यावेळी बालगोपाल आणि कुटुंबीयांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!' असा जयघोष करत भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप दिला. प्लास्टिकमुक्तीचा संदेश गणेशमूर्तीच्या विसर्जनासोबतच निर्माल्य व्यवस्थापनातही पर्यावरणाची काळजी घेण्यात आली. पूजेनंतर उरलेले निर्माल्य प्लास्टिकच्या पिशवीत न देता कागदामध्ये व्यवस्थित गुंडाळून अर्पण करण्यात आले. त्यामुळे प्लास्टिकचा वापर टाळण्यासोबतच निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करण्याचा संदेश देण्यात आला. महापौर दीपमाला काळे यांनी गणेशोत्सवाच्या काळात शहरातील नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा, असे आवाहन केले होते. त्यानंतर स्वतःच्या घरातील गणरायाचे विसर्जनही त्याच पद्धतीने करून त्यांनी आपल्या आवाहनाला कृतीची जोड दिली. घरगुती गणेशोत्सवात पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करून प्लास्टिकमुक्ती, निर्माल्य व्यवस्थापन आणि जलसंवर्धनाचा संदेश दिल्याबद्दल महापौरांच्या या उपक्रमाचे नागरिक तसेच पर्यावरणप्रेमींकडून कौतुक होत आहे. 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा' या आवाहनाला केवळ शब्दांपुरते मर्यादित न ठेवता कृतीतून त्याचा आदर्श घालून देत जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी आपल्या घरच्या श्री गणेशाचे पाचव्या दिवशी पर्यावरणपूरक पद्धतीने विधिवत विसर्जन केले. त्यांच्या या उपक्रमातून गणेशोत्सवात पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. महाआरतीनंतर महापौरांच्या निवासस्थानी गच्चीवर मोठ्या टबमध्ये पाणी घेऊन श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. महापौरांचे चिरंजीव नीरज मनोज काळे यांच्या हस्ते हा विधी पार पडला.

प्रवक्ता अॅकॅडमीत 'आनंद मेळावा' आणि गणेशोत्सव उत्साहात

जन सम्राट टाईम्स

कासोदा | प्रतिनिधी: गणेशोत्सवाचे औचित्य साधून कासोदा येथील प्रवक्ता अॅकॅडमीमध्ये 'आनंद मेळाव्या'चे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध खाद्यपदार्थ तसेच मनोरंजनात्मक खेळांचे आकर्षक स्टॉल्स उभारले. त्यामुळे अॅकॅडमीच्या परिसरात दिवसभर उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रवक्ता अॅकॅडमीच्या संचालिका सौ. अंकिता पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन व आरती करून करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी अभ्यास पुरेसा नसून, अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमधून त्यांना विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते. आनंद मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसाय कौशल्य, व्यवस्थापन, नियोजन आणि परस्पर सहकार्याचा



प्रत्यक्ष अनुभव मिळतो, असे त्यांनी नमूद केले. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध चविष्ट व खमंग खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारले होते. त्यासोबतच विविध खेळांचे स्टॉल्सही आकर्षणाचे केंद्र ठरले.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्टॉल्सची सजावट, खाद्यपदार्थांची मांडणी आणि विक्रीचे नियोजन अत्यंत उत्साहाने केले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून केवळ खाद्यपदार्थांची विक्रीच केली नाही, तर खर्चाचे नियोजन, किंमत ठरविणे, ग्राहकांशी संवाद, टीमवर्क आणि व्यवस्थापन यांसारख्या बाबींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. मित्र-मैत्रिणींसोबत गणेशोत्सवाचा आनंद घेत विद्यार्थ्यांनी मेळाव्यात मनसोक्त सहभाग नोंदविला. अॅकॅडमीतील शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांनीही विविध स्टॉल्सना भेट देत विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण अॅकॅडमी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

हा आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि व्यवस्थापन कौशल्यांना व्यासपीठ मिळाले.गणेशोत्सवाचे औचित्य साधून कासोदा येथील प्रवक्ता अॅकॅडमीमध्ये 'आनंद मेळाव्या'चे उत्साहात आयोजन करण्यात आले.

मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते मानाच्या गणपतीची महाआरती

विकासासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे : महाजन

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जळगाव शहर महानगरपालिकेतील मानाच्या गणपतीचे शुक्रवारी रात्री ९ वाजता राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांनी दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या हस्ते विघ्नहर्ता गणरायाची भावपूर्ण वातावरणात महाआरती करण्यात आली. महाआरतीसाठी पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महाआरतीनंतर उपस्थितांना संबोधित करताना गिरीश महाजन म्हणाले की, महानगरपालिकेची गौरवशाली परंपरा यापुढेही कायम राहिली पाहिजे. शहराच्या विकासासाठी महानगरपालिकेतील पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी परस्परांमध्ये उत्तम समन्वय राखून काम करणे आवश्यक आहे. जळगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंचावर जळगावच्या खासदार स्मिता वाघ, महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, भाजपचे गटनेते प्रकाश बालाणी, शिवसेनेचे गटनेते विष्णू भंगाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते प्रफुल्ल देवकर, मनपा आयुक्त आदित्य जीवने, अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर आणि उपायुक्त धनश्री शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी नगरसेवक सुनील खडके, अरविंद देशमुख, सुरेश सोनवणे, विशाल भोळे, वैशाली पाटील, अंकिता पंकज पाटील, कविता सागर पाटील, मानसी भोईटे, अमर जैन, नरेंद्र आत्माराम पाटील, रिटा सपकाळे, जाकीर खान पठाण, रमेश मतानी, उज्वला बाविस्कर, रेश्मा काळे, माधुरी बारी, अनिता भापसे, अनिल अडकमोल, विजय बांदल, कविता शिवदे यांच्यासह महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महाआरतीनंतर उपस्थित नागरिकांनी मानाच्या गणपतीचे दर्शन घेतले. तसेच नागरिकांच्या सहकार्याने विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या कार्यक्रमामुळे महानगरपालिका परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. जळगाव शहर महानगरपालिकेतील मानाच्या गणपतीचे शुक्रवारी रात्री ९ वाजता राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांनी दर्शन घेतले.



कुस्तीच्या आखाड्यात भवरखेडे विद्यालयाचा पहेलवान चमकला

जन सम्राट टाईम्स

धरणगाव | प्रतिनिधी: धरणगाव येथे आयोजित तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत भवरखेडे, विवरे येथील माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी कल्पेश शांताराम पाटील याने ५१ ते ५५ किलो वजन गटात दमदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. त्याच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एका मानाच्या यशाची भर पडली आहे. या स्पर्धेत धरणगाव तालुक्यातील विविध



विद्यालयांमधील कुस्तीपटूंनी सहभाग घेतला होता. कल्पेशने आखाड्यात आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांना चांगली झुंज दिली. त्याच्या आत्मविश्वासपूर्ण आणि दमदार कामगिरीमुळे त्याने स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. कल्पेशच्या या यशाबद्दल भवरखेडे, विवरे माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. शांताराम पाटील, मुख्याध्यापिका सोनल पाटील, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले. त्याला मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक पी. आर. ठाकरे यांचेही यावेळी कौतुक करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही विविध क्रीडा प्रकारांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि प्रोत्साहन मिळाल्यास हे विद्यार्थी तालुका, जिल्हा तसेच राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, हे कल्पेश पाटीलच्या यशातून अधोरेखित झाले आहे.

पाल शाळेत साकारली मानवी रांगोळी ३२४ विद्यार्थी, १२ शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग



जन सम्राट टाईम्स

पाल| प्रतिनिधी: विद्यार्थ्यांमध्ये सेवा, स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक योगदानाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाल येथे सेवा संकल्प सप्ताहांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. दि. १७ सप्टेंबर २०२६ पासून सुरू असलेल्या या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, आरोग्यविषयक मार्गदर्शन, 'सेवा माझे योगदान' या सत्रासह विविध शासकीय लाभाच्या योजनांची माहिती देण्यात येत आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत दि. १८ सप्टेंबर रोजी शाळेच्या प्रांगणात आकर्षक मानवी रांगोळी साकारण्यात आली. या उपक्रमात शाळेतील तब्बल ३२४ विद्यार्थी, ९ शिक्षक आणि ३ अंशकालीन शिक्षक, अशा एकूण १२ शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने एकत्र येत मानवी रांगोळी साकारून सेवा संकल्पाचा संदेश प्रभावीपणे जनमानसापर्यंत पोहोचविला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कुसुंबा केंद्राचे केंद्र समन्वयक भूषण चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक जावेद तडवी यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक ज्ञानेश्वर मोरे, विजय पारधी, गजमल पाटील, दीपक सोनवणे, पवन निकम, महेंद्र चौधरी, सोनल भुगवड्या आणि काळू जाधव यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, स्वच्छतेची सवय, आरोग्याबाबत जागरूकता आणि समाजासाठी योगदान देण्याची वृत्ती निर्माण व्हावी, या उद्देशाने सेवा संकल्प सप्ताहातील विविध उपक्रम राबविले जात आहेत. पाल शाळेतील या अभिनव उपक्रमाचे पालक तसेच ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

हप्ता थकला म्हणून गाडी बळकावता येणार नाही

फायनान्स कंपन्यांना सुप्रीम कोर्टाचा दणका मध्यरात्री वाहन जप्ती, बळाचा वापर आणि धमकीला चाप

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी : बँक किंवा फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन वाहन खरेदी करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, आर्थिक अडचणीमुळे कर्जाचा हप्ता थकल्यास काही फायनान्स कंपन्यांकडून खासगी एजंटांच्या माध्यमातून वाहन जप्त करण्याचे प्रकार घडतात. वाहनधारकांना धमकावणे, अवेळी फोन करणे तसेच मानसिक त्रास देण्याच्या तक्रारीही यापूर्वी समोर आल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालत सर्वोच्च न्यायालयाने वाहन जप्तीबाबत महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली आहे. कर्जाचा हप्ता थकला म्हणून कर्जदाराचे वाहन बळाचा वापर करून किंवा मध्यरात्रीच्या वेळी मनमानी पद्धतीने जप्त करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. कर्जवसुलीसाठी कायदेशीर प्रक्रिया पाळणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. तसेच संबंधित नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या भूमिकेकडेही न्यायालयाने लक्ष वेधले. नेमके प्रकरण काय? हरि दत्त शर्मा यांनी टाटा एसएफसी ४०७ ट्रक खरेदी करण्यासाठी चोला मंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स



कंपनी लिमिटेडकडून कर्ज घेतले होते. कर्जाचे हप्ते थकल्यानंतर कंपनीच्या एजंटांनी ९ एप्रिल २०२३ रोजी पहाटे सुमारे १ वाजता कोणतीही पूर्वसूचना न देता ट्रकचा स्टेअरिंग लॉक तोडून वाहन घेऊन गेल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला. त्यानंतर संबंधित ट्रक अवघ्या ४.५ लाख रुपयांना विकण्यात आला. या प्रकाराविरोधात याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर झाली. बळाचा वापर करून वसुलीला परवानगी नाही न्यायालयाने स्पष्ट केले की, कर्जवसुलीचा अधिकार करारातून मिळत असला तरी कर्ज वसुलीसाठी बळाचा वापर, धमकी किंवा कायदेशीर प्रक्रियेबाहेर जाऊन वाहन ताब्यात घेणे मान्य करता येणार नाही. कर्जदाराचे हक्क कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता हिरावून घेता येत नाहीत. न्यायालयाने संबंधित फायनान्स कंपनीला याचिकाकर्त्याचे कर्ज खाते बंद करण्याचे निर्देश दिले. तसेच वाहन विक्रीतून मिळालेले ४.५ लाख रुपये ६ टक्के वार्षिक व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. मानसिक त्रास आणि उपजीविकेवर झालेल्या परिणामासाठी १० लाख रुपये नुकसानभरपाई, तसेच ५० हजार रुपये खटला खर्च देण्याचेही निर्देश देण्यात आले. आरबीआयच्या नियमांच्या अंमलबजावणीवर प्रश्न बँका आणि एनबीएफसींसाठी रिझर्व्ह बँकेने कर्जवसुलीबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. मात्र, या नियमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे का, याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

दुष्काळी बैठकीत 'काजू-बदाम'वरुन वाद!

खासदार संजय जाधव संतापले, दुष्काळ आढावा बैठकीतील सुकामेव्याच्या पाहुणचाराचा व्हिडिओ चर्चेत

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विभागीय बैठकीत काजू-बदामाचा पाहुणचार झाल्याच्या मुद्द्यावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. बैठकीदरम्यान काही लोकप्रतिनिधी काजू-बदाम खात असल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर विरोधकांनी सरकारवर टीका केली. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अधिक संवेदनशीलता दाखवण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही म्हटले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांसमोरील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मात्र, बैठकीतील सुकामेव्याच्या ताटांमुळे बैठकीपेक्षा 'काजू-बदाम'चा मुद्दाच चर्चेत आला. काही लोकप्रतिनिधी व अधिकारी सुकामेवा खात असल्याचे दृश्य समोर आल्यानंतर समाजमाध्यमांवर त्यावर प्रतिक्रिया उमटल्या. पत्रकारांच्या प्रश्नावर संजय जाधव संतापले या प्रकरणाबाबत पत्रकारांनी शिवसेना (शिंदे गट) खासदार संजय जाधव यांना प्रश्न विचारला. त्यावेळी जाधव यांनी आपण परभणीहून आलो असून सकाळपासून नाश्ता केला नसल्याने भूक लागल्यावर समोर ठेवलेला बदाम खाल्ल्याचे सांगितले. 'दुष्काळ आहे म्हणून कोणी खात नाही का?' असा प्रतिप्रश्नही त्यांनी केला. बैठकीसाठी काजू-बदाम प्रशासनाकडून ठेवण्यात आले होते, आपण ते आणले नव्हते, त्यामुळे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना प्रश्न विचारावेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. पत्रकारांच्या प्रश्नांवर जाधव संतापल्याचे वृत्तही विविध माध्यमांनी दिले आहे. त्यामुळे काजू-



बदामाच्या मुद्द्याबरोबरच त्यांच्या पत्रकारांशी झालेल्या संवादाचीही चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनाला सूचना या वादावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय बैठकीत सुका मेवा ठेवण्याची पद्धत असली तरी दुष्काळासारख्या संवेदनशील परिस्थितीत प्रशासनाने प्रसंगावधान राखणे आणि अशा गोष्टी टाळणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रशासनाने परिस्थितीची जाणीव ठेवून अधिक संवेदनशीलतेने वागावे, असे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस यांनी विरोधकांनी दुष्काळाच्या प्रश्नाचे राजकारण करू नये, असे आवाहन केले.

तसेच दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंचनामे, मदत आणि पाणी नियोजनाबाबत सरकारकडून उपाययोजना सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. विरोधकांकडून सरकारवर टीका बैठकीतील सुकामेव्याच्या पाहुणचारावर विरोधकांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बैठकीतील या प्रकारावर नाराजी व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनीही या घटनेवर सरकारवर टीका करत दुष्काळी परिस्थितीवर विशेष अधिवेशन घेण्याची मागणी केली. दरम्यान, नांदेड बैठकीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या पाणी, चारा, पीकनुकसान आणि तातडीच्या मदतीच्या प्रश्नांवरून सरकारकडे विविध मागण्या होत आहेत. त्यामुळे काजू-बदामाच्या वादापलीकडे दुष्काळ निवारणासाठी प्रत्यक्ष उपाययोजनांकडे लक्ष देण्याची मागणीही पुढे आली आहे.मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विभागीय बैठकीत काजू-बदामाचा पाहुणचार झाल्याच्या मुद्द्यावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. बैठकीदरम्यान काही लोकप्रतिनिधी काजू-बदाम खात असल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर विरोधकांनी सरकारवर टीका केली. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अधिक संवेदनशीलता दाखवण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही म्हटले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांसमोरील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मात्र, बैठकीतील सुकामेव्याच्या ताटांमुळे बैठकीपेक्षा 'काजू-बदाम'चा मुद्दाच चर्चेत आला. पत्रकारांच्या प्रश्नावर संजय जाधव संतापले या प्रकरणाबाबत पत्रकारांनी शिवसेना (शिंदे गट) खासदार संजय जाधव यांना प्रश्न विचारला. त्यावेळी जाधव यांनी आपण परभणीहून आलो असून सकाळपासून नाश्ता केला नसल्याने भूक लागल्यावर समोर ठेवलेला बदाम खाल्ल्याचे सांगितले.

वाईतील सजग नागरिकांनी पोलिसांनाच बजावली कायदेशीर नोटीस!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । (प्रतिनिधी): गणेशोत्सवातील आगमन मिरवणुकीत डीजेचा दणदणाट झाल्यानंतर आता विसर्जन मिरवणुकीतही ध्वनी प्रदूषणाचा त्रास होण्याची शक्यता व्यक्त होत असताना वाईतील काही सजग नागरिकांनी थेट पोलिसांनाच कायदेशीर नोटीस बजावली आहे. गणेशोत्सव काळात निर्धारित ध्वनी मर्यादेचे पालन न झाल्यास किंवा ध्वनी प्रदूषण नियंत्रणात पोलिसांकडून हयगय झाल्यास न्यायालयात कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा या नोटीसमधून देण्यात आला आहे. नोटीसची प्रत जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनाही देण्यात आली आहे. एरवी पोलिसांकडून नागरिकांना नोटीस बजावली जाते. मात्र, वाईतील नागरिकांनी पोलिसांनाच नोटीस बजावल्याने या प्रकाराची शहरात चर्चा सुरू झाली आहे. गणेशोत्सवात कोणत्याही परिस्थितीत ध्वनी प्रदूषण होऊ नये आणि कायद्याचे पालन व्हावे, यासाठी काही नागरिकांनी महिनाभरापासूनच प्रयत्न सुरू केले होते. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून पोलिसांना कायदेशीर नोटीस देण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांच्या वतीने ॲड. रामदास धनावडे यांनी वाई पोलिसांना ही नोटीस बजावली आहे. नोटीसवर दिलीप आफळे, शिवाजी जगताप, प्रशांत डोंगरे, भाऊ मेहता, प्रशांत नागपूरकर, प्रमोद भिसे, संतोष दोंड आणि जितेंद्र जाधव आदी नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. नोटीस नेमकी कोणत्या कलमान्वये? ही नोटीस भारतीय दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील कलम ८० अन्वये देण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सक्षम दिवाणी न्यायालयात दावा दाखल करण्यापूर्वी कायद्याने आवश्यक असलेली पूर्वसूचना म्हणून या नोटीसीचा विचार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निर्धारित ध्वनी मर्यादेचा भंग झाल्यास संबंधित यंत्रणेविरुद्ध न्यायालयात कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार राहील.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पेयजल योजनेतील भ्रष्टाचाराविरोधात आडगाव ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा



जन सम्राट टाईम्स

यावल | प्रतिनिधी : तालुक्यातील आडगाव येथे राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाची प्रशासनाकडून चौकशी पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असतानाही संबंधितांवर अद्याप कोणतीही कायदेशीर अथवा दंडात्मक कारवाई झालेली नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर आडगाव ग्रामस्थांनी आता आंदोलनाचा इशारा दिला असून, २२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती कार्यालय, यावल येथे बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचे निवेदनातून स्पष्ट केले आहे. चौकशी झाली, मात्र कारवाईचे काय? आडगाव येथे राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याची विविध कामे करण्यात आली होती. या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप यापूर्वी करण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाच्या स्तरावर सदर कामांची चौकशी करण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, चौकशी पूर्ण होऊनही संबंधित पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्यावर कोणतीही ठोस कायदेशीर किंवा दंडात्मक कारवाई झालेली नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. पाठपुरावा करूनही ठोस निर्णय नसल्याचा आरोप प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी यापूर्वी पाणीपुरवठा उपविभाग, यावल तसेच स्थानिक ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करून वारंवार पाठपुरावा केल्याचे निवेदनात नमूद आहे. मात्र, अपेक्षित कारवाई न झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, अखेर लोकशाही मार्गाने बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'कारवाई होईपर्यंत उपोषण सुरूच' राष्ट्रीय पेयजल योजनेतील कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. जोपर्यंत संबंधित दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत बेमुदत उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हा परिषद जळगावचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग आणि यावल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे माहिती व आवश्यक कारवाईसाठी सादर करण्यात आल्या आहेत. या प्रकरणातील आरोपांवर संबंधित प्रशासन किंवा समितीच्या पदाधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नसून, पुढील कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

'खाकी पलीकडचे जीवन' पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन

मानसिकता आणि कौटुंबिक जीवनाचा मानसशास्त्रीय वेध

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: एस.एस. एम.एम. महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. सुवर्णा पाटील लिखित 'खाकी पलीकडचे जीवन : पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचा आणि कुटुंब जीवनाचा मानसशास्त्रीय वेध' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पी.टी.सी. संस्थेचे अध्यक्ष भाऊसो दिलीप वाघ, चेअरमन नानासो संजय वाघ, व्हा. चेअरमन नानासो व्ही.टी. जोशी, संस्थेचे पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वासुदेव वले आणि उपप्राचार्य डॉ. जे.व्ही. पाटील यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीसोबतच त्यांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक जीवनाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून वेध या पुस्तकात घेण्यात आला आहे. पोलीस कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण, अनिश्चित स्वरूपाचे कर्तव्य, कर्तव्य आणि कौटुंबिक जीवनातील समतोल तसेच पोलीस पत्नी, मुले आणि कुटुंबीयांचे अनुभव



यांचा संवेदनशीलतेने विचार करण्यात आला आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे संशोधनात्मक माहितीबरोबरच केस स्टडी, अनुभवकथन आणि भावनिक प्रसंगांच्या माध्यमातून पोलीस कर्मचाऱ्यांच्या जीवनातील मानवी पैलू उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभ्या असलेल्या कुटुंबाच्या निःशब्द योगदानालाही पुस्तकातून अधोरेखित करण्यात आले आहे.प्रा. डॉ. सुवर्णा पाटील या पिंपळगाव हरेश्वर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेंद्र पाटील यांच्या पत्नी आहेत. पोलीस कुटुंबाचा एक भाग म्हणून अनुभवलेले वास्तव, निरीक्षणे आणि संशोधनात्मक दृष्टिकोन यांची सांगड घालत त्यांनी या पुस्तकाची निर्मिती केली आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या कर्तव्याबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांच्या भावना, जबाबदाऱ्या आणि समायोजनाचे पैलूही पुस्तकातून प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत. डॉ. सुवर्णा पाटील या सेवानिवृत्त सहायक फौजदार सुभाष सर्जेराव पाटील यांच्या कन्या असून, पोलीस कुटुंबातील अनुभव आणि शैक्षणिक-संशोधनात्मक दृष्टिकोन यामुळे पुस्तकाला विशेष संदर्भ प्राप्त झाला आहे. प्रकाशन सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी, मान्यवर, सहकारी, मित्रपरिवार आणि हितचिंतक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. सुवर्णा पाटील यांच्या पुस्तक लेखनाचे कौतुक करून त्यांच्या पुढील संशोधनात्मक व साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्री मंगळग्रह मंदिरात उद्या श्री मंगळ जन्मोत्सव पंचामृत अभिषेक, ध्वजारोहण!

५६ भोग आणि श्री महाभोमयागाचे आयोजन

जन सम्राट टाईम्स

अमळनेर । (प्रतिनिधी): श्री मंगळग्रह देवांची विश्वातील एकमेव स्वयंभू मूर्ती असलेल्या अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही परम पवित्र श्री मंगळ जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा होणार आहे. मंगळग्रह सेवा संस्थेच्या वतीने भाद्रपद शुद्ध दशमी, सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी या जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराच्या इतिहासात हा दिवस अत्यंत महत्त्वाचा व पवित्र मानला जात असल्याने पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तिमय, चैतन्यमय आणि मंगलमय वातावरण निर्माण होणार आहे. दिवसभर धार्मिक कार्यक्रम जन्मोत्सवाची सुरुवात पहाटे ४ वाजता श्री मंगळग्रह देवांच्या मूर्तीवर वैशिष्ट्यपूर्ण पंचामृत अभिषेकाने होईल.

त्यानंतर सकाळी ६ वाजता फुलांनी सजवलेल्या पाळण्यात देवांचा प्रतिकात्मक जन्मोत्सव साजरा करण्यात येईल. सकाळी ७ वाजता



मंदिरावरील जुने ध्वज विधीवत उतरवून नवीन ध्वज लावण्यात येतील. त्यानंतर श्री मंगळग्रह देवांची महाआरती करून देवांना ५६ भोगांचा महाप्रसाद अर्पण करण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता रेती, शेती आणि मातीशी निगडित समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी श्री महाभोमयागाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता वाद्यवृंदाच्या साथीने श्री मंगळग्रह देवांची मंदिर परिसरातून वाजतगाजत पालखी मिरवणूक काढण्यात येईल.

त्यानंतर सायंकाळी ६ वाजता महाधुपारती होणार आहे. भाविकांना दर्शनाचे आवाहन श्री मंगळ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सर्व भाविकांनी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री मंगळग्रह देवांचे दर्शन तसेच तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळ आणि सेवेकऱ्यांनी केले आहे. मंदिराचे वेगळेपण खानदेशच्या भूमीला गौरव प्राप्त करून देणारे श्री मंगळग्रह मंदिर महाराष्ट्रासह देश-विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. मंदिरात श्री मंगळग्रह देवांची विश्वातील एकमेव स्वयंभू मूर्ती असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात येते. या मूर्तीशेजारी भूमीमातेची दाक्षिणात्य शैलीतील मूर्ती तसेच पंचमुखी हनुमानजींची मूर्ती आहे. मंदिर परिसरात भगवान श्री गुरुदत्त-माता श्री अनघालक्ष्मी यांच्या मूर्ती असलेले कमंडलूस्थित मंदिर तसेच भगवान श्री कालभैरव-माता भैरवी यांचे त्रिशूलात्मकस्थित मंदिरही आहे. श्री मंगळग्रह देवांची विश्वातील एकमेव स्वयंभू मूर्ती असलेल्या अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही परम पवित्र श्री मंगळ जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा होणार आहे.

राजपूत समाजातील ५२ गुणवंतांचा गुणगौरव; राजपूत समाज उन्नती मंडळाची वार्षिक आमसभा

जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी: चाळीसगाव येथील परदेशी-राजपूत समाज उन्नती मंडळाची वार्षिक आमसभा जावळे येथे रविवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता मंडळाचे अध्यक्ष भरतसिंग देवचंद छानवाळ यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी विविध परीक्षांमध्ये यश संपादन करणारे समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचा प्रशस्तीपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. एकूण ५२ गुणवंतांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मिनेश भगवान आणि महाराणा प्रताप यांच्या प्रतिमांचे पूजन, माल्यार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकातून संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. कर्तारसिंग परदेशी यांनी उन्नती मंडळाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. जावळे येथे सुरू असलेल्या मंगल कार्यालयाच्या बांधकामासाठी समाजबांधवांनी आर्थिक मदत



करून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. गुणगौरवामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक बांधव संदीप परदेशी (दिघी), विनोद परदेशी (नागद) आणि कैलास परदेशी (दिघी) यांनी केले. यावेळी बहाळ येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयसिंग थानसिंग परदेशी यांनी देशभक्तिपर गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. सभेचा अहवाल वाचन संचालक सुभाष मन्नूसिंग महाजन यांनी केले. यावेळी डॉ. रविंद्र परदेशी (वाघले), कुणाल परदेशी (नागद), हभप ज्ञानेश्वर माऊली (सातगाव) यांच्यासह समाजबांधव, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात भरतसिंग छानवाळ यांनी सांगितले की, समाजाच्या मंगल कार्यालयासाठी जावळे येथील भगवान परदेशी आणि गोरख परदेशी यांच्या कुटुंबीयांनी जमीन विनामूल्य दिली आहे. या जागेवर मंगल कार्यालयाचे बांधकाम सुरू झाले असून, उर्वरित बांधकाम पूर्ण करण्यासाठी समाजबांधवांनी आर्थिक मदतीचा हात पुढे करावा. असे आवाहन त्यांनी केले.

धुळ्यात 'पुष्पा स्टाईल' बनावट दारू कारखाना उद्ध्वस्त

बंद पोल्ट्री फार्मच्या आडून सुरू होता बनावट देशी-विदेशी दारू निर्मितीचा कारखाना

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: बंद पोल्ट्री फार्मच्या आडून सुरू असलेल्या बनावट दारू निर्मितीच्या कारखान्यावर धुळे दारूबंदी विभागाने छापा टाकून कारखाना उद्ध्वस्त केला. या कारवाईत बनावट देशी-विदेशी दारू, तयार विदेशी ब्लेंड तसेच दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण २ लाख ५९ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपी फरार असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे तालुक्यातील तिखी शिवारात बंद पोल्ट्री फार्मचा आडोसा घेत बनावट दारू



निर्मिती सुरू असल्याची गोपनीय माहिती दारूबंदी विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी बनावट दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच तयार दारू आणि विदेशी ब्लेंड आढळून आले. पोल्ट्री फार्मच्या आडून अशा प्रकारे बनावट दारू निर्मितीचा व्यवसाय सुरू असल्याचे कारवाईत उघडकीस आले. दारूबंदी विभागाने घटनास्थळावरील साहित्य ताब्यात घेत कारखाना उद्ध्वस्त केला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत २ लाख ५९ हजार ७८० रुपये असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. या प्रकरणातील फरार आरोपीचा शोध सुरू असून, बनावट दारू निर्मितीचा हा प्रकार किती दिवसांपासून सुरू होता, त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच तयार दारूची विक्री कुठे केली जात होती, याबाबत दारूबंदी विभागाकडून पुढील तपास करण्यात येत आहे. ही कारवाई दारूबंदी विभागाचे आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त यू. आर. वर्मा आणि अधीक्षक स्वाती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दुय्यम निरीक्षक डी. जी. गवळी, दुय्यम निरीक्षक एस. एम. मोरे तसेच जवान मनोज धुळेकर, मयूर मोरे, कल्पेश शेलार आणि एन. डी. मोरे यांच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली. बंद पोल्ट्री फार्मच्या आडून सुरू असलेल्या बनावट दारू निर्मितीच्या कारखान्यावर धुळे दारूबंदी विभागाने छापा टाकून कारखाना उद्ध्वस्त केला. या कारवाईत बनावट देशी-विदेशी दारू, तयार विदेशी ब्लेंड तसेच दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण २ लाख ५९ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपी फरार असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे तालुक्यातील तिखी शिवारात बंद पोल्ट्री फार्मचा आडोसा घेत बनावट दारू निर्मिती सुरू असल्याची गोपनीय माहिती दारूबंदी विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती.

मोदींचा ७६ वा वाढदिवस 'सेवा संकल्प अभियाना'ने साजरा!

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त भाजप जळगाव जिल्हा महानगराच्या वतीने 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत विविध सेवा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत सर्वप्रथम सकाळी १० वाजता जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव येथे गरीब व गरजू रुग्णांना अन्नदान तसेच फळवाटप करण्यात आले. यावेळी आमदार सुरेश भोळे (राजूमामा), जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महापौर दीपमाला काळे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, सायंकाळी ७.३० वाजता जी.एम. फाउंडेशन येथील भाजप कार्यालयात गणपतीची महाआरती करण्यात आली. यावेळी ७५ दिवे प्रज्वलित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात वाढदिवसाचा उत्साह साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, महापौर दीपमाला काळे, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, गटनेते प्रकाश बालाणी, माजी महापौर सीमा भोळे, माजी जिल्हाध्यक्ष उज्ज्वला बेंडाळे, कार्यक्रमाचे संयोजक दीपक परदेशी, उदय भालेराव यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.७६व्या वाढदिवसानिमित्त भाजप जळगाव जिल्हा महानगराच्या वतीने 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत विविध सेवा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

धरणगावच्या रुग्णसेवेला 'जीपीएस'चे बळ

नवी रुग्णवाहिका जनसेवेत विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

धरणगाव / जळगाव, । प्रतिनिधी: धरणगाव शहराच्या विकासाला शासन व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गती देण्यात आली असून, शहरातील विविध विकासकामे प्रगतिपथावर आहेत. उपजिल्हा रुग्णालयाचे काम सुरू असून बालकवी ठोंबरे स्मारक पूर्णत्वाकडे आले आहे. तसेच विश्रामगृहाचे कामही अंतिम टप्प्यात आहे. धरणगाव व जळगाव तालुक्यातील बेरोजगार युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने येत्या सहा महिन्यांत धरणगाव येथे सूतगिरणीच्या भूमिपूजनाचा मानस आहे. धरणगाव शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. धरणगाव शहरातील श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या कार्यालयाच्या आवारात जीपीएस परिवारामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या नवीन रुग्णवाहिकेच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जीपीएस परिवाराने सर्वसामान्यांच्या हितासाठी विविध सामाजिक व जनोपयोगी उपक्रम राबविले आहेत. नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेली रुग्णवाहिका पांडव बहुउद्देशीय फाउंडेशनकडे संचालनासाठी सोपविण्यात आली आहे. या रुग्णवाहिकेचा लाभ विशेषतः गरजू व सर्वसामान्य रुग्णांना मिळावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. धरणगाव शहर व परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने रुग्णसेवा मिळावी, या उद्देशाने जीपीएस परिवाराने ही रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. तिचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रुग्णवाहिकेच्या प्रत्यक्ष संचालनाची जबाबदारी पांडव बहुउद्देशीय फाउंडेशनकडे सोपविण्यात आली आहे. दरम्यान, धरणगाव शहरासाठी लवकरच शववाहिका उपलब्ध करून देण्याचा संकल्प असल्याचेही पालकमंत्र्यांनी सांगितले. तसेच पाळधी येथे जीपीएस परिवारामार्फत उभारण्यात येत असलेल्या आधुनिक अभ्यासिकेच्या धर्तीवर धरणगावातही आधुनिक अभ्यासिका उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. युवा नेते तथा जीपीएस परिवाराचे प्रमुख आणि माजी जिल्हा परिषद सदस्य



प्रतापराव पाटील यांच्या संकल्पनेतून व पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जीपीएस परिवाराच्या माध्यमातून विविध सामाजिक व जनोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. धरणगावच्या रुग्णसेवेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली रुग्णवाहिका हा त्याच सामाजिक बांधिलकीचा भाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेनेचे उपशहरप्रमुख रविंद्र महाजन यांनी केले. प्रास्ताविकात राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या माध्यमातून धरणगाव शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. तसेच रुग्णवाहिकेची गरज आणि तिच्या उपलब्धतेची पार्श्वभूमी स्पष्ट केली. नगरपालिकेचे माजी गटनेते पप्पू भावे यांनी आभार मानले. यांची होती उपस्थिती कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ॲड. शरद माळी, पी. एम. पाटील सर, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, माजी तालुकाप्रमुख गजानन नाना पाटील, शहरप्रमुख धीरेंद्र पूर्भे, भाजपाचे भगवान महाजन, ॲड. संजय महाजन, कैलास माळी, उद्योगपती शिरीष बयास, वसंतराव भोलाणे, कन्हैया रायपुरकर, न.पा. गटनेते विलास महाजन, नगरसेवक मच्छिंद्र पाटील, सुरेश महाजन, पवन महाजन, सोनू महाजन, तोसिफ पटेल, पप्पू कंखरे, भूषण कंकरे, हर्षल चव्हाण, बाळासाहेब जाधव, वाल्मीक पाटील यांच्यासह जीपीएस परिवार आणि पांडव बहुउद्देशीय फाउंडेशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.धरणगाव शहराच्या विकासाला शासन व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गती देण्यात आली असून, शहरातील विविध विकासकामे प्रगतिपथावर आहेत. उपजिल्हा रुग्णालयाचे काम सुरू असून बालकवी ठोंबरे स्मारक पूर्णत्वाकडे आले आहे. तसेच विश्रामगृहाचे कामही अंतिम टप्प्यात आहे. धरणगाव व जळगाव तालुक्यातील बेरोजगार युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने येत्या सहा महिन्यांत धरणगाव येथे सूतगिरणीच्या भूमिपूजनाचा मानस आहे. धरणगाव शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. आवारात जीपीएस परिवारामार्फत आलेल्या नवीन रुग्णवाहिकेच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जीपीएस परिवाराने सर्वसामान्यांच्या हितासाठी विविध सामाजिक व जनोपयोगी उपक्रम राबविले आहेत. नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेली रुग्णवाहिका पांडव बहुउद्देशीय फाउंडेशनकडे संचालनासाठी सोपविण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी ।TI। मध्ये विशेष सत्र ऑनलाइन फसवणूक



जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र आणि जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सत्रात वैष्णवी पाटील, स्नेहल पाटील, प्रियदर्शनी भांडारकर आणि खुशबू लांबोळे यांनी उपस्थितांना सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. सत्रादरम्यान ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, विशिंग, स्मिशिंग, OTP व पासवर्ड सुरक्षितता यांसह विविध प्रकारच्या सायबर धोक्यांची माहिती देण्यात आली. मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, द्विस्तरीय प्रमाणीकरण (2-Factor Authentication), सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच बनावट लिंक आणि QR कोड स्कॅमपासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच सायबर बुलिंग, डिजिटल गोपनीयता, अज्ञात व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे, मोबाईल ॲप्स डाउनलोड करताना घ्यावयाची खबरदारी आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्याच्या विविध उपाययोजनांवरही सविस्तर माहिती देण्यात आली. संवादात्मक आणि प्रभावी पद्धतीने पार पडलेल्या या सत्राला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहभागी व्यक्तींनी विविध प्रश्न उपस्थित करून सायबर सुरक्षेच्या संदर्भातील शंकांचे निरसन करून घेतले. ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सतर्क राहण्यासोबतच सुरक्षित डिजिटल जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. या सायबर सुरक्षा जनजागृती सत्रासाठी ITI – Industrial Training Institute, Jalgaon येथील उपस्थितांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आमदार दहीहंडीच्या Reels स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

अक्षय पायघन प्रथम, हर्ष राजपूत द्वितीय तर शिव सोनार तृतीय

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पर्वानिमित्त एरंडोल विधानसभा मतदारसंघातील 'आमदार दहीहंडी' सोहळ्याच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या Reels Competition ला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात विजेत्या स्पर्धकांना गौरविण्यात आले.

आमदार दहीहंडी सोहळ्याचे भव्य स्वरूप, जल्लोष आणि अविस्मरणीय क्षण Reelsच्या माध्यमातून सादर करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेला डिजिटल माध्यमातून सादर केले. स्पर्धेतील Reelsचे परीक्षण करताना व्हिडिओची गुणवत्ता, प्रभावी मांडणी, एडिटिंग, क्रिएटिव्हिटी, कॅमेरा अँगल, ट्रान्झिशन आणि फ्रेमिंग यांसह Instagramवरील Likes, Comments, Shares आणि



Reach या निकषांचाही विचार करण्यात आला. अक्षय पायघन प्रथम स्पर्धेत शेंदुर्णी, ता. जामनेर येथील अक्षय पायघन याने प्रथम क्रमांक पटकावला. पारोळा येथील हर्ष राजपूत याने द्वितीय, तर एरंडोल येथील शिव सोनार याने तृतीय क्रमांक मिळविला. प्रथम क्रमांकासाठी ₹११,१११ चे बक्षीस श्री. कोमल हिम्मतराव पाटील (श्री बालाजी स्वयंसेवक, पारोळा), द्वितीय क्रमांकासाठी ₹७,००० चे बक्षीस श्री. मयूर सुकलाल भोई (तालुकाध्यक्ष, भोई समाज युवा मंच, पारोळा) आणि तृतीय क्रमांकासाठी ₹५,५५५ चे बक्षीस दादासो. साहेबराव विनायक पाटील (संचालक, शेतकी संघ, पारोळा) यांनी आयोजित केले होते. विजेत्या स्पर्धकांना आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. आयोजकांचाही सत्कार स्पर्धेच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेणारे सिद्धांत मोरे आणि विक्की चौधरी यांचा यावेळी आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे युवकांना त्यांच्या कलागुणांसह डिजिटल सर्जनशीलता, व्हिडिओ निर्मिती आणि सोशल मीडिया कौशल्ये सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. पारंपरिक उत्सवातील क्षण आधुनिक डिजिटल माध्यमातून मांडण्याचा हा उपक्रम युवकांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरला.

नाहाटा महाविद्यालयात 'भारतीय ज्ञान परंपरा'वर विद्यापीठस्तरीय कार्यशाळा

जन सम्राट टाईम्स



भुसावळ । (प्रतिनिधी): नाहाटा महाविद्यालयात शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ रोजी 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी भारतीय ज्ञान परंपरेच्या अभ्यासाला महत्त्व देण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे अध्यक्षस्थानी होते. जामनेर महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. बी. डी. पाटील उद्घाटक म्हणून उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. एन. पाटील, डॉ. जी. आर. वाणी, स्पर्धा परीक्षा व मार्गदर्शन सेलचे समन्वयक डॉ. एस. के. राठोड तसेच IKS समन्वयक डॉ. पी. ए. अहिरे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. ए. अहिरे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. ममता पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. सचिन राजपूत यांनी करून दिला. तीन सत्रांत तज्ज्ञांचे मार्गदर्शन कार्यशाळेत तीन सत्रांमध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. पहिल्या सत्रात जामनेर महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र विषयाचे प्रा. बी. डी. पाटील यांनी 'भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन भारतातील ज्ञानस्रोत' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथील प्रा. डॉ. विवेक श्रावगे यांनी 'प्राचीन भारतातील शेती व्यवस्था आणि व्यापार' या विषयावर माहिती दिली. प्राचीन भारतातील कृषी पद्धती, व्यापार व्यवस्था आणि तत्कालीन आर्थिक जीवनाच्या विविध पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला. तिसऱ्या सत्रात नाहाटा महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. पी. ए. अहिरे यांनी 'प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था आणि विद्यापीठे' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती, विद्यापीठांची परंपरा आणि ज्ञाननिर्मितीच्या विविध प्रवाहांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. भारतीय ज्ञान परंपरा हा विषय F.Y. B.A., B.Com., B.Sc., BBA आणि BCA या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा असून, विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञानपरंपरेतील विविध क्षेत्रांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समारोपप्रसंगी सहकार्याबद्दल कौतुक कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी नाहाटा महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. डी. एन. पाटील अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेचे आभार प्रा. डॉ. ममता पाटील यांनी मानले.

'नशामुक्त युवा–विकसित भारत'साठी भुसावळमध्ये जनजागृती

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: मेरा युवा भारत, जळगाव आणि जळगाव जिल्हा पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने, पोलीस उपविभागीय कार्यालय, भुसावळ तसेच श्री संत गाडगे बाबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या सहकार्याने 'नशामुक्त युवा–विकसित भारत संकल्प अभियान' आणि 'मिशन RISE' अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस उपविभागीय अधिकारी केदार बारबोले यांच्या हस्ते झाले. यावेळी केदार बारबोले यांनी विद्यार्थ्यांना NDPS Act मधील कायदेशीर तरतुदी, अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांचे गांभीर्य तसेच युवकांशी निगडित विविध महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. प्रोबेशनरी डेप्युटी सुपरिटेंडंट ऑफ पोलीस प्रशांत दरेकर यांनी युवकांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहण्यासोबतच आपल्या मित्रपरिवारालाही व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.



सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपाली जगताप यांनी PPT च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या अमली पदार्थांची माहिती देत त्यांचे शारीरिक व मानसिक परिणाम, NDPS Act मधील तरतुदी, नशेपासून बचावाच्या उपाययोजना, उपलब्ध हेल्पलाईन तसेच नशामुक्त भारत अभियानात युवकांची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल बारजिभे यांनी विद्यार्थ्यांना नशेपासून दूर राहून शिक्षण, कौशल्यविकास आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेरा युवा भारत स्वयंसेवक कमलेश सोनावणे यांनी केले, तर स्वयंसेवक कृष्णा पुरोहित यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ दिली. यावेळी मेरा युवा भारत, जळगावचे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चवरे, महाविद्यालयाचे प्रा. गिरीश कुलकर्णी व प्रा. राम अग्रवाल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत नशामुक्तीची शपथ घेतली. त्यापैकी १० विद्यार्थ्यांची 'ड्रग वॉरियर' म्हणून निवड करण्यात आली. हे विद्यार्थी आगामी काळात 'नशामुक्त युवा–विकसित भारत' अभियानांतर्गत जनजागृती उपक्रम राबविणे, युवकांमध्ये नशामुक्तीचा संदेश पोहोचविणे तसेच आवश्यकतेनुसार पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याची भूमिका बजावणार आहेत. 'नशामुक्त युवा–विकसित भारत' या संकल्पनेला बळ देत युवकांनी व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी सक्रिय भूमिका बजावावी, असा संदेश या जनजागृती कार्यक्रमातून देण्यात आला.

वाकोद येथे जागतिक बांबू दिन साजरा

बांबू पूजनातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश; औषधी व पर्यावरणीय महत्त्वावर प्रकाश

जन सम्राट टाईम्स

वाकोद । प्रतिनिधी: जैन इरिगेशनचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या जन्मगावी वाकोद येथील जैन फार्ममध्ये जागतिक बांबू दिनानिमित्त छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बांबू पूजन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच बांबूचे पर्यावरणीय, औषधी आणि मानवी जीवनातील महत्त्व याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी १९८९ मध्ये वाकोद जैन फार्म येथे १० बाय १० अंतरावर 'मानवेल' या वाणाच्या बांबूची प्रायोगिक तत्त्वावर लागवड केली होती. बांबूविषयी त्यांना विशेष आस्था होती. विविध



सार्वजनिक कार्यक्रमांमधून त्यांनी बांबूचे महत्त्व अधोरेखित केले होते. "बांबू मला दृढनिश्चयाचं प्रतीक वाटतो. परिस्थिती कितीही कठीण असो, स्वाभिमानाने उभे राहण्याची प्रेरणा बांबूपासून मिळते," असे विचार त्यांनी व्यक्त केले होते. वाकोद येथील फार्ममध्ये बांबूच्या वाढीचे निरीक्षण करण्यात आले असून, २४ तासांत ९ ते १२ इंच वाढ झाल्याची नोंद असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बांबू ही वेगाने वाढणाऱ्या वनस्पतींपैकी एक असून, पर्यावरणाच्या दृष्टीनेही त्याचे महत्त्व मोठे आहे. बांबूची लागवड, त्याचा उपयोग तसेच कार्बन शोषणातील संभाव्य योगदान याबाबतही यावेळी माहिती देण्यात आली. बांबूच्या कोंबांचा आहारातील उपयोग, त्यापासून तयार होणारे लोणचे आणि भाजी तसेच पारंपरिक औषधी उपयोग याबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली. "मानवी जीवनात बांबूचे अनन्यसाधारण महत्त्व आहे," असे वाकोद फार्मचे वरिष्ठ व्यवस्थापक विनोदसिंह राजपूत यांनी सांगितले. कार्यक्रमात गणपत शेळके, सौ. करुणाबाई शेळके आणि विनोदसिंह राजपूत यांच्या हस्ते बांबू पूजन करण्यात आले. यावेळी संदीप बावस्कर, संतोष वानखेडे, विजय सपकाळे, चेतन धामोडे, सीमा जाधव, लताबाई जवखेडे, मीराबाई कुरंगे, रेणुकाबाई पाटील, रेखाबाई जाधव आदी उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासोबतच बांबूच्या विविध उपयोगांची माहिती समाजापर्यंत पोहोचविणे आणि हरित संस्कृतीला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. जैन इरिगेशनच्या सामाजिक बांधिलकीतून पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. जैन इरिगेशनचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या जन्मगावी वाकोद येथील जैन फार्ममध्ये जागतिक बांबू दिनानिमित्त छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बांबू पूजन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच बांबूचे पर्यावरणीय, औषधी आणि मानवी जीवनातील महत्त्व याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी १९८९ मध्ये वाकोद जैन फार्म येथे १० बाय १० अंतरावर 'मानवेल' या वाणाच्या बांबूची प्रायोगिक तत्त्वावर लागवड केली होती. बांबूविषयी त्यांना विशेष आस्था होती. विविध सार्वजनिक कार्यक्रमांमधून त्यांनी बांबूचे महत्त्व अधोरेखित केले होते.

दिनकर राठोड यांना 'भास्कराचार्य ऋषी गौरव पुरस्कार' जाहीर!

जन सम्राट टाईम्स

चाळीसगाव | प्रतिनिधी: करगाव येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्ते दिनकर राठोड यांना खान्देश बहुउद्देशीय मंडळ संचलित आणि देवगिरी प्रांत विद्या भारती संलग्न देवगिरी प्रांत शिक्षा संस्थेच्या वतीने देण्यात येणारा मानाचा 'भास्कराचार्य ऋषी गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. दिनकर राठोड यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार वितरण सोहळा २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता सरस्वती शिशु वाटिका, उंबरखेड-आडगाव रस्ता, उंबरखेड, ता. चाळीसगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास चाळीसगावचे आमदार मंगेश रमेश चव्हाण, भाजप जळगाव शहर अध्यक्ष दिपक प्रभाकर सूर्यवंशी, शिक्षण सभापती पोपट एकनाथ भोळे तसेच विद्या भारती देवगिरी प्रांताचे संघटन मंत्री प्रकाश भिवसन पोलकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दिनकर राठोड यांना प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विकासो करगावचे सर्व संचालक मंडळ, विनय राठोड, एकनाथ गोफणे, भागवत हडपे, कोमलसिंग जाधव तसेच वसंतराव नाईक अधिकारी-कर्मचारी संघटनेचे तालुका अध्यक्ष विजय राठोड यांच्यासह मित्रपरिवार आणि समाजबांधवांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सामाजिक कार्यातील योगदानाची दखल घेत मिळालेला हा सन्मान राठोड यांच्या कार्याचा गौरव करणारा ठरला असून, त्यांच्या निवडीबद्दल परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.